Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# नैसर्गिक जोड्या

“जरा घोटाळा झालाय
मी किंग आणि क्वीनच्या
जोड्या केल्या ना, म्हणून.”
बायको नवऱ्याला म्हणाली.
“त्यात कसला घोटाळा ?
जोड्या किंग क्वीनच्याच करायला हव्यात”
त्याने सांगितलं
“म्हणजे तसं नाही रे
बिछान्यात, बेडमध्ये
समजलं कां ?”
तिने खुलासा केला.
“बेडमध्येच किंग क्वीनच्या
जोड्या नाही केल्या
तर वंश कसा चालू राहील ?”
तिच्या मूर्खपणापुढे तो
आता हताश झाला होता.
“तुला समजत कसं नाही ?
सेल होता ना म्हणून मी
फिटेड किंग साईझ शीट
फ्लॅट क्वीन शीटबरोबर मॅच केला रे”
तिने परत खुलासा केला.
“आयला, म्हणजे इतके दिवस आपल्या बेडवर
तू किंग किंगशी मॅच
करत होतीस ?
म्हणजे आपण इतके दिवस
किंग किंग असे झोपत होतो …
च् च् बरोबर वाटत नाही”
मग तो गंभीरपणे उद्गारला
यापुढे तू किंग क्वीन अशाच जोड्या कर.
सगळं कसं नैसर्गिक हवं”

पूर्वप्रसिद्धी एकता १९७९-१९८२